दै.लोकमत - २३/१२/२०१८

दै. लोकमत २३/१२/२०१८



सावर्डेच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरात एनएसएसच्या स्वयंसेवकांनी बंधारा बांधला.

# हडकणी येथे श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**खेर्डी :** कला महाविद्यालय, सावर्डेच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर हडकणी येथे पार पडले. या शिबिरात गावातील मंदिरे, ग्रामपंचायत कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला, तर विहीर व झरे गाळ काढून स्वच्छ करण्यात आले.

तसेच सार्वजनिक विहिरींजवळ ग्रामस्थ व एनएसएसच्या स्वयंसेवकांनी बंधारा बांधला. पाणी वाचवा, स्वच्छता अभियानाचा प्रचार व प्रसार करण्यात आला. यावेळी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शेती उद्योगातील नवीन वाटा - विलास घाग, पालक बालक सुसंवाद - डी. ए. पाटील, व्यक्तिमत्त्व विकास - प्रकाश वावरे, जगावं कसं - प्रकाश कदम, कुमारवयीन मुलींच्या समस्या - मीरा जोशी व कोकणातील ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व याविषयी प्रा. श्रावणी मोरे यांची व्याख्याने झाले.

उद्घाटन समारंभाला माजी सरपंच अण्णा घाग, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मुकुंद जाधव व ग्रामसेवक सकपाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. तानाजी कांबळे यांनी केले. दीप्ती दोरखडे यांनी आभार मानले. यावेळी सचिन घाग यांच्यासह ग्रामस्थांनी त्यांना सहकार्य केले.

दै.पुढारी - १०/०३/२०१८



सावर्डे : कला महाविद्यालयात महिलादिनी मुलींना मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या युगंधरा राजेशिर्के शेजारी प्राचार्य तानाजी कांबळे व प्राध्यापक.

# तंत्रज्ञान युगात संवाद हरवतोय : राजेशिर्के

**सावर्डे : वार्ताहर**

आजच्या मुली या शरीराने व मनाने कमकुवत होत असून त्यांचा समाज्यातील सहभाग दूर्मीळ होऊन डिजीटलच्या अतिवापराने माणसा -माणसातील सुसंवाद हरविल्याने आचार-विचार, नैतिक व सांस्कृतिक मूल्ये कालबाह्य होत आहेत. मुलीने आपली शारीरिक क्षमता वाढवून वैचारिक परिवर्तन करून समाज सहभाग वाढवावा, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या युगंधरा राजेशिर्के यांनी केले

कला महाविद्यालयात जागतिक महिला दिनी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. महिला दिनाचे औचित्य साधून तयार केलेल्या भितीपत्रकाचे राजेशिर्के यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. राजेशिर्के म्हणाल्या की, मुलीने शिक्षणाचा उपयोग स्वावलंबी होण्यासाठी करावा. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत स्थिर राहून आपण काय आहोत व काय करायचे आहे याचा विचार करून कष्टाची तयारी ठेवली पाहिजे. तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे आजची पिढी भरकटत चालली असून आपण काय करतो याचे भान ठेवून वागणे गरजेचे आहे.

प्रास्ताविकात डॉ. दीप्ती शेंबेकर यांनी महिला दिनाविषयीचे महत्व सांगितले. यावेळी प्रा. जयसिंग चवरे, प्रा. संकेत कुरणे, सोनल सुर्वे व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. माधवी पाटील तर आभार अनुष्का काजरोळकर यांनी मानले.

दै. पुढारी - ०५/०३/२०१८

५ मार्च २०१८



सावर्डे : सह्याद्री कला महाविद्यालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करताना मान्यवर.

# सह्याद्री कला महाविद्यालयातील ग्रंथ प्रदर्शनाला वाचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सावर्डे (वार्ताहर) :** महाविद्यालयीन पिढीला वाचन संस्कृतीकडे वळवण्यासाठी, वाचन संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्यासाठी, मराठी भाषा समृद्ध व्हावी, या प्रमुख उद्देशाने सह्याद्री शिक्षण संस्थेच्या कला महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शन पार पडले. साहित्याबाबत पुस्तके, ग्रंथ मांडण्यात आले होते. मराठी भाषा दिन यावेळी साजरा करण्यात आला. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष शेखर निकम यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अशोक विचारे, डॉ. सुनीतकुमार पाटील, सरपंच सुभाष मोहिरे, शांताराम खानविलकर, डी. ए. पाटील, प्राचार्य तानाजी कांबळे, प्राध्यापक उपस्थित होते. तानाजी कांबळे यांनी प्रमुख मान्यवरांचे स्वागत केले. ग्रंथपाल अनुष्का काजरोलकर यांनी ग्रंथ प्रदर्शनाचे नियोजन केले.

दै.पुढारी - २३/०३/२०१८

## विचाराने समृद्ध व्हा : माधवी जाधव

**सावर्डे : वार्ताहर** आज समाज शिकला, शहाणा झाला. मात्र, त्यांच्यातील विचाराचे अज्ञानपण गेले नाही. शिक्षणाने माणूस समृद्ध झाला असे जरी म्हटले असले तरी आजही विचाराने माणूस कमकुवतच आहे. विचार बदला तसे ते विचार कृतीतही आणा तरच समृद्ध समाज निर्माण होईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास अधिकारी माधवी जाधव यांनी केले. त्या सावर्डेतील कला व विज्ञान महाविद्यालयात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. जाधव म्हणाल्या की, महिलांनी सक्षम बनले पाहिजे. त्यांच्यावर होणारे अत्याचार त्यांनी सहन न करता कायदेशीर मार्गाने न्याय मिळवण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे.